जाहिरात क्र. ........................

## पुणे महानगरपालिका
## जाहिरात प्रकटन

पुणे शहरातील धोक्याची बांधकामे आणि अनाधिकृत बांधकामे तपासणी या कामासाठी कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) या पदावर सहा महिने मुदतीसाठी करार पध्दतीने नेमणूक करणेकरीता खालीलप्रमाणे शैक्षणिक पात्रता धारण करणा-या व गुणवत्तेनुसार उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत.

| अ. क्र. | पदाचे नाव | एकवट वेतन र. रू. | शैक्षणिक पात्रता | पदांची संख्या | गट | खात्याचे नाव | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) | ३५,०००/- (पदवी)<br>३०,०००/- (पदविका) | मान्यता प्राप्त विद्यापीठाची स्थापत्य अभियांत्रिकी शाखेची पदवी/ पदविका अगर अगर तत्सम पदवी/पदविका<br>अनुभव – अभियांत्रिकी संवर्गातील कामाचा ०३ वर्षाचा अनुभव असणे आवश्यक | २५ | अ.जा. – ३,<br>अ.ज. – २,<br>वि.जा.अ. – १,<br>भ. ज.(ब) – १,<br>भ. ज.(क) –१,<br>भ.ज.(ड) –०,<br>वि.मा.प्र –०,<br>इ.मा.व. – ५,<br>एसईबीसी –४,<br>आर्थिकदृष्टया दुर्बल घटक – ३,<br>खुला –५ | शहर अभियंता कार्यालय | |

उपरोक्त नमूद पदासाठी आरक्षणामधील शैक्षणिक पात्रता धारण करणा-या उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत असून संबंधित पदासाठी पात्र असणा-या उमेदवारांनी पुणे महानगरपालिकेच्या www.pmc.gov.in या संकेतस्थळावर recruitment या सदरात ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरावेत.

अर्ज करण्याची पध्दत व सर्वसाधारण सूचना –

१. वयोमर्यादा – खुल्या वर्गातील उमेदवाराचे वय जाहिरातीचे दिनांकास ३८ वर्षापेक्षा जास्त नसावे. मागासवर्गीय उमेदवारांसाठी वयोमर्यादा ५ वर्षाने शिथिल असेल.

२. वरील शैक्षणिक पात्रता व अनुभव आवश्यक

३. सदरचे पद अत्यंत अस्थायी स्वरूपाचे आहे.

४. उमेदवारांकडे पात्रता व अनुभवाचे मूळ कागदपत्र असणे आवश्यक आहे.

५. उमेदवारांनी एक पासपोर्ट आकाराचा फोटो व आवश्यक मूळ कागदपत्रांच्या छायांकित स्वयं साक्षांकित केलेल्या सत्यप्रतीचा एक संच सादर करणे आवश्यक आहे.

६. अर्ज करताना उमेदवारांची जन्मतारखेच्या पुराव्यासाठी जन्मतारखेचा दाखला किंवा शाळा सोडल्याच्या दाखल्याची साक्षांकित प्रत अथवा जन्मतारखेची नोंद असलेली शालान्त परीक्षेच्या उत्तीर्ण सर्टिफिकेटची साक्षांकित प्रत जोडणे आवश्यक.

७. उमेदवार मागासवर्गीय असल्यास जातीचा स्पष्ट उल्लेख करून कोणत्या प्रवर्गात मोडत आहे याचा उल्लेख करावा.

८. अनुसूचित जमाती मधील उमेदवारांना जातवैधता प्रमाणपत्र अर्जासोबत सादर करणे आवश्यक आहे.

९. अर्जदार महिला विवाहित असल्यास शासनमान्य विवाह नोंदणी प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे.

१०. विहित पात्रता धारण न करणा-या उमेदवारांचे अर्ज अपुर्ण किंवा चूकीचे भरलेले अर्ज, वय, शैक्षणिक अर्हता गुणपत्रक, जातीचा दाखला, अनुभव इत्यादी संदर्भातील आवश्यक त्या प्रमाणपत्राच्या साक्षांकित सत्य प्रती जोडले नसलेले अर्ज अपात्र समजण्यात येतील.

११. निवड झालेल्या उमेदवारांना विहीत नमुन्यात करारनामा करून फक्त ६ महिन्यांकरीता नेमणूक दिली जाईल.

१२. उमेदवारांची निवड गुणवत्तेनुसार करण्यात येईल. येणा-या उमेदवारांना स्वखर्चाने उपस्थित रहावे लागेल.

१३. वरील पद हे अस्थायी स्वरूपाचे असल्याने या पदावर कायमस्वरूपी नियुक्ती मागण्याचा हक्क असणार नाही.

१४. वरील पदासाठी कामाचे स्वरूप ठरविण्याचे अधिकार मा. खातेप्रमुख यांना राहील.

१५. अपात्र ठरलेल्या उमेदवारांच्या बाबतीत कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही.

१६. उमेदवारास नियुक्ती देण्याबाबतचे सर्व अधिकार मा. महापालिका आयुक्त यांनी स्वतःकडे राखून ठेवले आहेत. याबाबत कोणालाही कोणत्याही प्रकारचा दावा सांगता येणार नाही.

१७. रिक्त पदांच्या संख्येत कमी/जास्त बदल होण्याची शक्यता आहे. याबाबत अर्जदाराला कोणताही दावा करता येणार नाही.

१८. निवडीच्या कोणत्याही टप्प्यावर अर्जदार अर्हताधारण न करणारा आढळल्यास, गैरवर्तन करताना आढळल्यास, दबाव तंत्राचा वापर करताना आढळल्यास उमेदवारी आपोआप रद्दबातल होईल. तसेच नियुक्ती झाली असल्यास कोणतीही पूर्वसूचना न देता त्याची नियुक्ती समाप्त करण्यात येईल.

१९. निवड झालेल्या उमेदवारास सेवेत रूजू होण्यापूर्वी एका महिन्याचे मानधन अनामत रक्कम म्हणून मनपा कोषागारात चलनाद्वारे भरावे लागेल व त्यावर कोणत्याही प्रकारचे व्याज मिळणार नाही.

२०. अन्य कारणाने नावामध्ये बदल केला असल्यास शासन राजपत्राची प्रत सादर करावी.

२१. मध्यस्त/ठग/पुणे मनपात संबंध असल्याचे भासविणा-या व्यक्ती यांच्या गैरमार्गाने नोकरी मिळवून देण्याच्या आश्वासनापासून सावध राहणाच्या उमेदवारांना सुचना देण्यात येत आहे.

२२. तसेच उमेदवारांनी कोणत्याही अफवांवर विश्वास ठेवू नये अथवा भुलथापांना बळी पडू नये.

शहर अभियंता कार्यालय, रूम नं. १०३, बांधकाम विभाग, शिवाजीनगर पुणे ४११००५ येथे ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरल्या नंतर त्याची प्रिंट काढून संकेतस्थळावर प्रसिध्द केलेल्या जाहिरातीमधील नमुद कागदपत्रांच्या प्रती स्वयं साक्षांकित सह अर्ज कार्यालयीन वेळेत (सुट्टीचे दिवस वगळून) दि. ३१/०१/२०२० - रोजी पर्यंत सादर करावा.

(प्रशांत वाघमारे)
शहर अभियंता
पुणे महानगरपालिका